महाराष्ट्र शासन

उपजिल्हाधिकारी,सामान्य प्रशासन यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी ०:०२४५२-२२७२०१
e-mail-dcgparbhani@gmail.com

जा.क्र.२०१९/संकिर्ण/साशा/२-क/कावी-
जिलहाधिकारी कार्यालय परभणी
दिनांक ०: – ०४.०५.२०१९

प्रति,

कार्यालय प्रमुख सर्व

जिल्हा परभणी

विषयः- कोटपा (COTPA-2003 ) कायद्यांतर्गत सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालय , शासकीय संस्था व कार्यालयाचा परिसर हा तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांपासून प्रतिबंधीत करणे बाबत.

संदर्भः- १. केंद्र शासनाने निर्गमीत केलेले दिनांक २०.११.२०१८ रोजीचे परिपत्रक क्रमांक D.O.No.P.16012/06/2017- TC

२. मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक , राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक १९०५/२०१८ दिनांक /१२/२०१८.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक , राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी सर्व शासकीय , अशासकीय व निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था , बँका , परिवहन कार्यालय व इतर सार्वजनीक ठिकाणे गर्दीच्या ठिकणी येथे धुम्रपान करणे , तंबाखु व तंबाखूजन्य पदार्थ्यांचे सेवन /वापर करणे वर्जीत केलेले आहे. त्या अनुषंगाने आपल्या कार्यालयात व आपल्या अधिनिस्त येणा-या सर्व कार्यालयांमधून दर्शनी भागावर ,प्रवेशव्दारावर,निकासव्दारावर व प्रत्येक मजल्यावर "धुम्रपान निषेध क्षेत्र " व " तंबाखूजन्य पदार्थ वर्जीत क्षेत्र" असे ६०x ४५ सेंटीमिटरचे स्वच्छ व ठळक आक्षरातील फलक लावण्यात यावे. व सदरील लावण्यात आलेल्या फलकाच्या छायाचित्राची प्रत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी यांचे ई मेल आयडी parbhani.ntcp@gmail.com वर दिनांक ३१.०५.२०१९ पुर्वी सादर करावा.

करीता सुलभ संदर्भासाठी संदर्भ क्रमांक २ चे पत्र सोबत जोडण्यात आलेले असून सदरील पत्रात नमूद केल्याप्रमाणे विनाविलंब त्वरीत कार्यवाही करावी.

(Dsc Sig)
(पी.शिव शंकर)
जिल्हाधिकारी , परभणी
तथा अध्यक्ष, जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रम परभणी

प्रतिलिपी,

१. सदस्य सचिव, तथा जिल्हा शल्य चिकित्सक , जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रम परभणी यांना अनुपालनास्तव.

२. [illegible] तंबाखू नियंत्रण कार्यक्रम मराठवाडा ग्रामीण विकास संस्था परभणी यांना माहितीस्तव.

Signature valid
Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.05.07 1?:35:49 IST
Reason: Approved

## राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम :

जगात एका वर्षात तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थाच्या सेवनाने ६० लाख लोकांचा मृत्यु होतो. World Health Organization (WHO) च्या मतानुसार जगभरात शतकात दहा कोटी जणांचा अकाली मृत्यु तंबाखूमुळे झाला आहे. हा कल असाच राहिला तर २१ व्या शतकात १० कोटी लोकांचा अकाली मृत्यु तंबाखू सेवनाने होवू

**तंबाखु मुळे होणाऱ्या आजारा विरुद्ध लढण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम २००७ व २००८ मध्ये चालू केला असून त्याची उद्दीष्टे :-**

**अ)** तंबाखु वापरामुळे होणाऱ्या घातक दुष्परिणांमा बद्दल जनजागृती **(ब)** तंबाखु व तंबाखु जन्य पदार्थाचे उत्पादन व पुरवठा कमी करणे

**क) कोटपा (COTPA-2003) कायद्याची खात्रीशीर अंमलबजावणी करणे (ड)** तंबाखुचे व्यसन सोडण्यासाठी लोकांना सहयोग करणे

**ई)** WHO ने दिलेल्या नियम व अटीनुसार तंबाखु च्या वापारावर प्रतिबंध आणि नियंत्रण करण्यासाठी सहयोग करणे.

१) GATS-2 (Global Adult Tobacco Survey) चा भारतातील सर्व्हे तंबाखू सेवनाने तरुणामध्ये किती प्रमाणा आहे याचा दुसरा जागतिक सर्वे २०१६-१७ ला करण्यात आला होता. यामध्ये भारतात २८.६ % इतके लोक तंबाखू सेवन करतात असे आढळून आले आहे.

२) एकुण कॅन्सर झालेल्या रुग्णामध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणाऱ्याचे प्रमाण पुरुषांमध्ये अधिक असून हेच प्रमाण महिलामध्ये एक चतुर्थांश इतके याचबरोबर हृदयाचा रक्तवाहिन्या व फफ्फुसाच्या जुनाट आजारांचा रोग होण्याचा संभव वाढतो.

३) WHO भाकित/मतानूसार २०२० मध्ये भारतात १५ लाख लोकांचा मृत्यु कॅन्सरमुळे होऊ शकतो. सध्या संपूर्ण जगात इतर देशाच्या तुलनेत तोंडाचा कॅन्सर झालेल्या रुग्णाची संख्या भारतात जास्त आहे.

४) GATS-2 (Global Adult Tobacco Survey) महाराष्ट्रात GATS-2 च्या २०१६-१७ अहवालानूसार २६.६% तरुण (यामध्ये ३५.५% पुरुष आणि महिलांचे प्रमाण १७ % इतके) तंबाखूचे सेवन करतात. यामध्ये धुम्रपान व धुम्रपान विरहित तंबाखू सेवन करण्याचे प्रमाण आहे.

५) सर्वेक्षणानुसार GATS-1 मध्ये १५-१७ वयोगटातील मुलांमध्ये २९% इतके प्रमाण होते ते GATS-2 मध्ये ५.५% पर्यंत वाढले आहे.

६) तंबाखू खाण्याची सुरुवात वयाच्या १५-१७ या वर्षात होते. GATS-2 च्या ससर्वेक्षणानूसार हे वय वर्ष १८.५ वरुन कमी होऊन वय वर्षे १७.४ वर आले आहे. अत्यंत धोकादायक आहे.

७) भारतात सार्वजनिक ठिकाणी करीत असलेल्या धुम्रपानामुळे Second Hand Smoke ला प्रत्येक ५ माणूस बळी पडतो. 39 World Health Assembly मध्ये व्या जागतिक आरोग्य सभेमध्ये एक ठराव पास करण्यात आला, यामध्ये Second Hand Smoke मुळे मृत्यु होणाऱ्यांना यामध्ये लहान मुले व तरुणांना संरक्षण देण्यात आले.

## Advancing Tobacco Control Program -

तंबाखुच्या वापरामुळे होणाऱ्या मृत्युमध्ये घट आणण्यासाठी व राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत राज्य व जिल्हा तंबाखु कक्षास सहायोग करण्यासाठी मराठवाडा ग्र विकास संस्था (MGVS) मार्फत **The Union** - International Union Against Tuberculosis & Lung Disease च्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली Advancing Toba Control Project महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामध्ये (COTPA-2003) कायद्या अंतर्गत येणाऱ्या विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी (COTPA-2003) कायद्याचे अधिकार, कर्तव्य व जवाबदारी व कायद्यातील तरतुदी संदर्भात सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी (औरंगाबाद,बीड,जालना,परभणी, नां हिंगोली) या जिल्ह्यामध्ये कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत आहे.

**या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे :** (COTPA-2003) कायद्याचे अधिकार, कायद्यातील नवीन तरतुदी यासंदर्भात शासकीय व निमशासकीय अधिकारी सहाय्यक व मार्गदर्शन करणे, तंबाखु उत्पादकांची तंबाखु नियंत्रण कार्यक्रमात हस्तक्षेपाची दखल घेणे, कार्यक्षेत्रातील जिल्ह्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या होणारी तंबार जाहिरात, प्रोत्साहन, सहयोगाची घटनांची दखल घेणे. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समन्वय समितीस (COTPA-2003) ची अंमलबजावणी व देखरेख करण्यासाठी सह करणे. या प्रकल्पाचे अंतिम उद्दिष्ट जिल्हाकार्यक्षेत्र तंबाखु मुक्तकिंवा धूरमुक्त करणे असा आहे.

**भारत सरकारने २००३ मध्ये कोटपा (COTPA 2003) कायदा पास केला व यामध्ये सिगारेट व अन्य तंबाखू जन्य पदार्थावर नियंत्रण आणले गेले (यामध्ये तंबाखू जन्य पदार्थाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिराती विक्री, व्यापार उत्पादन पुरवठा आणि वाटप याचा समावेश आहे.)**

## कोटपा २००३ कायद्याचे नियम :

| कलम | नियम | उल्लघन केल्यास दंड | पद्धत |
|---|---|---|---|
| १. कलम ४ | सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी | अ) वैयक्तिक गुन्हा केल्यास २०० रु. पर्यंत दंड<br>ब) मालक/व्यवस्थापक अधिकृत अधिकारी यांना सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान बंदीचे उल्लघन केल्यास गुन्हाच्या संख्येप्रमाणे दंड | प्रत्यक्ष जागेवर दंड करणे |
| २. कलम ५ | तंबाखुजन्य पदार्थाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहीरातीवर बंदी | अ) पहिला गुन्हा असेल तर २ वर्ष शिक्षा किंवा १००० रु. पर्यंत दंड | अजामीनपात्र गुन्हा जागेवर दंड नाही |
| ३. कलम ६ अ | १८ वर्षाखालील व्यक्तिनां तंबाखुजन्य पदार्थ विकण्यास बंदी | अ) २०० रु. पर्यंत दंड | प्रत्यक्ष जागेवर दंड करणे |
| कलम ६ ब | शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी | अ) २०० रु. पर्यंत दंड | प्रत्यक्ष जागेवर दंड करणे |

| कलम | नियम | उल्लघन केल्यास दंड | पद्धत |
|---|---|---|---|
| ४. कलम ७ | सर्व तंबाखूजन्य पदार्थाच्या वेस्टनावर निर्देशित धोक्याची सूचना देणे | अ) उत्पादकाचा पहिला जामीनपात्रगुन्हा असेल तर २ वर्षापर्यंत शिक्षा व ५००० रु. दंड<br>ब) दुसरा गुन्हा असेल तर ५ वर्षापर्यंत शिक्षा किंवा १० हजार रु.दंड<br>क) विक्रेत्याचा पहिला गुन्हा असेल तर १ वर्षापर्यंत शिक्षा किंवा १ हजार रु. पर्यंत दंड<br>ड) दुसरा गुन्हा असेल तर २ वर्षापर्यंत शिक्षा किंवा ३ हजार दंड | अजामीन पात्र गुन्हा प्रत्यक्ष जागेवर दंड करता येणार नाही |

## कलम-४ चे दंड वसूल व अंमलबजावणी करणारे अधिकृत अधिकारी

| क्र. | केंद्रीय अंमलबजावणी व दंड वसूल करणारे अधिकारी | सार्वजनिक ठिकाणे |
|---|---|---|
| १. | विक्रीकर/प्राप्तीकर/कस्टम/परिवहन या विभागाचे उपनिरीक्षक व उच्च पदावरील अधिकारी | सर्व सार्वजनिक क्षेत्रातील ठिकाणे |
| २. | रेल्वे स्थानक प्रमुख, सहाय्यक प्रमुख | रेल्वे स्टेशन आणि परिसर |
| ३. | राज्य केंद्र सरकारचे सर्व राज पत्रित अधिकारी, रुग्णालय प्रशासक, जिल्हा शल्य चिकित्सक | सर्व सरकारी कार्यालये स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिका |
| ४. | संचालक, वैद्यकीय अधिकारी, रुग्णालय प्रशासक, जिल्हा शल्य चिकित्सक | सरकारी व खाजगी रुग्णालय |
| ५. | पोस्ट मास्टर व त्यापदावरील अधिकारी | पोस्ट ऑफीस सार्वजनिक खाजगी |
| ६. | संस्थेचे प्रमुख/मानव संसाधन अधिकारी, प्रशासन अधिकारी | कार्यालये व कामाचे ठिकाण |
| ७. | महाविद्यालय व शाळेचे प्राचार्य, मुख्याध्यापक,ग्रंथपाल | संबंधित शाळा व महाविद्यालय |
| ८. | ग्रंथालय अधिकारी, सहाय्यक ग्रंथपाल व प्रशासकीय अधिकारी | पुस्तकालय/वाचनालय |
| ९. | विमानतळ व्यवस्थापक, भारतीय विमानतळ प्राधिकरण अधिकारी | विमानतळ |
| १०. | सार्वजनिक आरोग्य विभाग आणि आरोग्य सेवा संचालक | त्यांच्या आखत्यारीतील सार्वजनिक ठिकाणे |
| ११. | राज्य आणि केंद्र सरकारचे अधिकारी | त्यांच्या आखत्यारीतील सार्वजनिक ठिकाणे |
| १२. | संचालक आरोग्य सेवा, नोडल अधिकारी राज्य व जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष | त्यांच्या आखत्यारीतील सार्वजनिक ठिकाणे |
| १३. | पोलीस उपनिरीक्षक व उच्च पदावरील अधिकारी | त्याच्या आवरातील पोलीस स्टेशन |
| १४. | अन्न व औषध विभागातील उपनिरीक्षक व उच्च पदावरील अधिकारी | सर्व सार्वजनिक ठिकाणे |
| १५. | पंचायत राज संस्थेचे पदाधिकारी (सरपंच किंवा पंचायत समिती) | त्याच्या आवारातील सर्व सार्वजनिक ठिकाणे |
| १६. | राष्ट्रीय आरोग्य विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी किंवा जिल्हा लेखश व्यवस्थापक | सर्व सार्वजनिक ठिकाणे |
| १७. | जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी | रुग्णालय, इमारती, वैद्यकीय शिक्षण संस्था, औषधालय |
| १८. | निबंधक, उपनिबंधक, सरकारी वकील, शासनाचे सल्लागार | न्यायालयीन इमारत |
| १९. | जिल्हा शिक्षण अधिकारी व शाळा निरीक्षक | शैक्षणीक संस्था |
| २०. | वाहतुक अधिकारी सहाय्यक वाहतुक अधिकारी बसस्थानक प्रमुख,तिकीट तपासनिक,कंडक्टर | सार्वजनिक वाहतुकीचे ठिकाणे |
| २१. | तिकिट तपासनीस, वरिष्ठ तिकीट निरीक्षक तिकिट निरीक्षक व अधिकारी व रेल्वे | रेल्वे स्टेशन व परीसर |
| २२. | पोलिस प्रशासनातील सहाय्यक उपनिरीक्षक त्या पदापेक्षा मोठे अधिकारी | |


## कोटपा कायदा २००३ अंतर्गत कलम ६ (अ,ब) दंड वसूल करणारे अधिकारी

| अ.क्र. | दंड वसूल करणारे अधिकारी |
|---|---|
| १. | कुलसचिव/संचालक/मुख्याध्यापक, प्राचार्य व शैक्षणिक संस्थेचे प्रमुख |
| २. | अन्न व औषध विभागातील उपनिरीक्षक दर्जाचे सर्व अधिकारी |
| ३. | सहाय्यक कामगार आयुक्तकामगार विभाग |
| ४. | निरीक्षक दर्जाचे सर्व अधिकारी, शिक्षण विभाग |
| ५. | महानगर पालिका आरोग्य अधिकारी |
| ६. | पंचायत राज संस्थेचे पदाधिकारी (सरपंच किंवा ग्रामसेवक) |
| ७. | पोलीस विभागाचे उपनिरीक्षक किंवा त्यावरील पदाचे अधिकारी |
| ८. | राष्ट्रीय आरोग्य मिशनचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी किंवा जिल्हा लेखा व्यवस्थापक |
| ९. | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी |
| १०. | गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी |
| ११. | संचालक/सहसंचालक राज्य आरोग्य विभाग आणि राज्य शिक्षण विभाग |
| १२. | राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे राज्य व जिल्हा स्तरावरील नोडल अधिकारी. |

## कलम ५ व ७ साठी अंमलबजावणीसाठी अधिकृत अधिकारी

| क्र. | दंड वसूल करणारे अधिकारी | विभाग |
|---|---|---|
| १. | कस्टम आणि केंद्रीय अधिकारी (Central Excise) विभागातील अधीक्षक व त्यावरील अधिकारी | सर्व विभागातील नोंदणीकृत महसूल विभाग |
| २. | विक्रीकर/आरोग्य/परिवहन विभागातील निरिक्षक दर्जाचे व त्यावरील अधिकारी | महसूल/आरोग्य/परिवहन |
| ३. | कनिष्ठ कामगार आयुक्त | कामगार विभाग |
| ४. | सहसंचालक लघुउद्योग विभाग | लघुउद्योग विभाग |
| ५. | पोलिस व अन्न औषध विभागातील उपनिरीक्षक दजार्च व त्यावरील अधिकारी | गृह विभाग/अन्न व औषध प्रशासन |

## कलम ६-अ व ६-ब प्रमाणे तंभाकु विक्री करणारे ठीकाण व शैक्षणीक संस्था येथे खालील प्रमाणे फलक असावे:




**१८ वर्षाखालील मुलांना तंबाखु अथवा तंबाखुजन्य उत्पादन विकणे हा कायद्याने गुन्हा आहे.**

**या शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात कुठलाही तंबाखु जन्य पदार्थ विकण्यास कायद्याने बंदी आहे.**
**या कायद्याचे उल्लंघन करण्याऱ्यास २००/- रुपाया पर्यंत दंड वसुल केला जाईल.**

## कलम ४ अनुससार सर्व सार्वजनीक (कार्यालय, हॉटेल, भोजनालय, गार्डन, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन इत्यादी) ठिकाणी खालील प्रमाणे फलक असावे:

**धुम्रपान निषेध क्षेत्र** | **NO SMOKING AREA**

येथे धुम्रपान करणे कायद्याने गुन्हा आहे. | SMOKING HERE IS AN OFFENCE

उल्लंघन करण्याऱ्यास २००/- रुपया पर्यंत दंड वसुल केला जाईल. | The violators will be challaned with fine upto Rs.200/-


येथे कोणीही धुम्रपान करीत असेल तर कृपया तक्रार नोंदवा | IN CASE SOMEONE SMOKE HERE PLEASE LODGE A COMPLAINT WITH

सुरक्षा अधिकारी फोन : .................... | SECURITY OFFICER PH : ............................

30cm

15cm

60 cm




कलम ७ अनुसार तमाखु जन्य पदार्थंच्या पाकीटांवर अशी चित्रमय चेतावणी असावी.



महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

राज्य आरोग्य सोसायटी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कार्यालय

आरोग्य भवन, ३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२-२२७१ ७५०० | ईमेल : mdnrhm.mumbai@gmail.com | www.nrhm.maharashtra.gov.in

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

जा.क्र.संआसे/ NTCP /तंबाखू/ ५५७०-५८/२०१८
दिनांक - /१२/२०१८

**विषय - शासकीय/निमशासकीय कार्यालय, शासकीय संस्था व कार्यालयांचा परिसर हा तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांपासून प्रतिबंधीत करणेबाबत...**

**संदर्भ - केंद्र शासनाचे निर्गमीत केलेले दि. २०/११/२०१८ रोजीचे परिपत्रक क्र. D.O.No.P.16012/06/2017- TC**

केंद्र शासनाच्या स्वास्थ आणि परिवार कल्याण विभागाच्या सचिव मा. प्रिती सुदान यांनी सर्व शासकीय/निमशासकीय इमारतींचा परिसर हा तंबाखू खाणे, थुंकणे व धुम्रपान विरहीत करण्याकरीता दि. २७/११/२०१८ रोजी पत्र दिले आहे.

सर्वांना माहिती आहे की, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या खाण्यामुळे, थुंकण्यामूळे/धुम्रपानामुळे आरोग्यावर घातक परिणाम होतात. कर्करोग, हृद्यरोग, मधूमेह, फुप्फुसांचे आजार, पक्षाघात, व्यंधत्व, अंधत्व, क्षयरोग, मुखरोग इत्यादी प्रकारचे आजार प्रामुख्याने तंबाखू खाणे, थुंकणे व धुम्रपान करण्यामुळे होतात.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा - २००३ च्या कलम - ४ प्रमाणे जे व्यक्ती तंबाखूचे सेवन करत नाही अशा व्यक्तींना जे व्यक्ती धुम्रपान व तंबाखूचे सेवन करतात त्यांच्या पासून संरक्षण करण्याकरीता शासकीय कार्यालये/ निमशासकीय कार्यालये/ कार्यालयाचा परिसर/ उपहार गृहे इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तंबाखू खाणे / धुम्रपान करणे/ थुंकणे हे प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

त्यामुळे या सर्व लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच कार्यालये स्वच्छ ठेवण्याकरीता "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" या अभियानाचा एक भाग म्हणून सर्व शासकीय कार्यालये/ निमशासकीय कार्यालये/ कार्यालयाचा परिसर/ उपहार गृहे इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तंबाखू खाणे / धुम्रपान करणे/ थुंकणे इत्यादींसाठी प्रतिबंधीत आहे व हा कायद्याने गुन्हा आहे त्यामुळे आपल्या कार्यालयात या गोष्टींवर प्रतिबंध करण्यात यावा.

यासाठी आपल्या कार्यालयीनस्तरावरुन मार्गदर्शक सुचना काढाव्यात तसेच आपले व आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालये, निमशासकीय कार्यालये, रुग्णालये तंबाखू मुक्त करावे. तंबाखू मुक्त परिसरात धुम्रपान करणे व तंबाखू खाऊन थुंकणे हा दंडात्मक गुन्हा आहे असे घोषित करावे. तंबाखू मुक्त कार्यालये यासाठीच्या मार्गदर्शक सुचना केंद्रशासनाने पाठविल्या आहेत त्याचे मराठीकरण करुन सोबत जोडलेले आहे. त्याचप्रमाणे आपल्या जिल्हयातील आपल्या अधिनस्त सर्व कार्यालये " तंबाखू मुक्त परीसर " म्हणून घोषित करावे व दर्शनिभागावर सोबत जोडल्याप्रमाणे सुचना फलक लावावे.

(तंबाखू मुक्त परिसरासाठीच्या मार्गदर्शक सुचना व दर्शनी भागात लावण्यात येणारी फलक याचे प्रारुप सोबत जोडले आहे.)

आयुक्त (आरोग्य सेवा)
तथा अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रति,

१) जिल्हा अधिकारी (सर्व)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)
३) जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा सामान्य रुग्णालय (सर्व)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

# परीपत्रक

तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाने/धुम्रपान यामुळे मानवी शरीरावर दुष्परिणाम होतात, असंसर्गजन्य रोगांमधील कर्करोग, हृदयविकार, मानवी हृदयाशी निगडीत रोग, फुफुस्सांचा कर्करोग हे सर्व तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाशी निगडीत आहेत. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांमध्ये ६ ते ८ अशी घटक आहेत ज्यांमुळे लोक मृत्यूमुखी पडतात. भारतामध्ये दरवर्षी होणाऱ्या मृत्यूंमध्ये ८ - ९ लाख मृत्यू हे तंबाखू सेवनाने होत असतात.

सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान केल्यामुळे आणि थुंकल्यामुळे त्यामधून स्वाईन फ्लु, क्षयरोग, निमोनीया आणि पोटाचे विकार इत्यादी जंतूसंसर्गजन्य आजार पसरतात. क्षयरोगाचा विषाणू हा थुंकीद्वारे पसरतो त्यामुळे इतर लोकांना सार्वजनिक क्षेत्रामध्ये थुंकल्यामुळे आरोग्यास धोका निर्माण होतो.

धुम्रपान आणि तंबाखूच्या सेवनापासून तरुणांना/युवापीढीला आणि जनसामान्यांना दुर ठेवण्या करीता केंद्र शासनाने सिगारेट आणि तंबाखू जन्य उत्पादने (जाहीरात,प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे नियमन) कायदा २००३ तयार केला आहे.

सार्वजनिक ठिकाणी त्यामध्ये शासकीय कार्यालये/निमशासकीय कार्यालये/शासकीय संस्था/ कार्यालयातील कामाची जागा, उपहारगृह व सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान न करणाऱ्या व्यक्तींच्या संरक्षणाकरिता सिगारेट आणि तंबाखू जन्य इतर उत्पादने प्रतिबंधक कायदा २००३ च्या कलम - ४ अंतर्गत तंबाखू खाणे/थुंकणे/धूम्रपाण करण्यास प्रतिबंध आहे.

भारतीय दंड संहितेच्या कलम - २६८ मध्ये अंतर्भुत केल्याप्रमाणे 'जिच्या मुळे जनतेला अथवा आजुबाजूस राहणाऱ्यांना अथवा ज्यांची मालमत्ता अथवा वहीवाट आहे. अशा सरसगट सर्व लोकांना नुकसान अटकाव धोका किंवा त्रास होतो. अशी कोणतीही कृती करणारी किंवा अश्या बेकायदेशीर कृती करणारी व्यक्ती सार्वजनिक उपद्रवाबद्दल दोषी असते. सामाईक उपद्रवामुळे काही सोय अथवा फायदा होतो या कारणवरुन तो माफ होत नाही'.

करीता जनसामान्यांचा आरोग्य दृष्टीकोनातून आणि शासकीय इमारती स्वच्छ राहण्यासाठी "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" माहिमेद्वारे शासकीय इमारतीची साफसफाई करुन शासकिय कार्यालये व परीसर हा "तंबाखू मुक्त परिसर" म्हूणन जाहिर करण्यात आला आहे. सदर परिसरामध्ये धुम्रपान आणि थुंकणे हे दंडात्मक गुन्हा आहे.


➢ शासकीय ईमारतीच्या प्रत्येक मुख्यद्वार/ईतर द्वार जिथून ईमारतीमध्ये प्रवेश होतो. प्रत्येक मजल्याच्या लिप्ट शेजारी आणि विविध भागांमध्ये, पुढील तरतुदीसह तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या निशेधार्थ फलक चिटकवणे

१) फलक हा कमीत कमी ६० से.मी. X ३० से.मी. असावा.

२) सदर फलकामध्ये पुढील सुचना इंग्रजी तथा स्थानिक भाषेचे इमारतीमध्ये व आवारात नमूद कराव्यात " सिगारेट अथवा तंबाखूजन्य उत्पादने वापरण्यास मनाई/बंदी आहे. असे आढळल्यास रु. २००/- इतका दंड आकारण्यात येईल

३) सदर फलकाच्या खालील बाजूस ज्या अधिकाऱ्याकडे तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची जबाबदारी दिली आहे त्याचे नाव, पदनाम व दुरध्वनी क्रमांक छापण्यात यावा.

चित्र नं. १





२) सदर तंबाखू प्रतिबंधीत कायद्याचे सिगारेट आणि तंबाखू जन्य उत्पादने कायदा २००३ चे उल्लंघन झालेले आढळल्यास राजपत्रित अधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास दंडात्मक कार्यवाहीची रक्कम जमा करुन उल्लंघन करणाऱ्यास दंडपावती देतील व रक्कम जमा करुन घेतील पावतीचा नमुना परीशिष्ट-१ मध्ये जोडला आहे

३) जमा झालेली रक्कम ही त्या कार्यालयाच्या विभागाच्या लेखाशिर्षांतर्गत जमा करण्यात यावी.

४) शासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ फलक हा १२० से.मी. X ६० से.मी एवढा असावा.

५) शासकीय इमारतीच्या सर्व द्वारांवर तंबाखू उत्पादन जमा करण्याकरीता एका पेटीची व्यवस्था असली पाहीजे जो कोणी तंबाखूचे उत्पादन बाळगत असेल तो सदर पेटीमध्ये तंबाखू उत्पादने जमा करील अशा स्पष्ट सुचना दर्शनी भागावर लावण्याल याव्यात .

चित्र क्र. २



# पावती

मंत्रालय/कार्यालय ..................................................................................................

पावती क्र...............

पावती दि.

मिळालेली रक्कम.......................... (शब्दामध्ये) ..........................................................
......................................................................................................................

यांच्याकडून ..........................................................................................................

पुर्ण पत्ता ...........................................................................................................
......................................................................................................................

.................................................................................................. च्या खात्यावर

च्याकडून .................................. (परिसराचे नाव) येथे सिगारेट आणि तंबाखू जन्य उत्पादने (जाहीरात,प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे नियमन) कायदा २००३ गुन्हयाचे उल्लंघन झाले आहे. परीपत्रक दि......................

स्वाक्षरी, (उल्लंघन कर्ता)

............................

प्राधीकृत अधिकारी

........................